कार्यालय पोलीस उप अधिक्षक,लाच लुचपत प्रतिबंधक विभाग,जालना

टोल फ्रि क्रमांक १०६४

कार्यालय दुरध्वनी क्र. :- ०२४८२-२२०२५२

:: प्रेस नोट :: दिनांक :- २८.०५.२०१९

**ग्रामपंचायत मौजे बाजीउम्रद, ता. जि.जालना येथील ग्रामसेविका श्रीमती मंजुषा जगधने व खाजगी इसम श्री.कांता टोपे यांना 12,000/- रुपयाची लाचेची मागणी केल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना येथे त्यांचेवर गुन्हा दखल केला.**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | आरोपीचे नाव, हुद्दा व पत्ता | :- | १) श्रीमती मंजुषा गोविंदरव जगधने वय ३२ वर्ष,व्यवसाय-नौकरी,ग्रामसेविका, ग्रामपंचायत बाजीउम्रद, पंचायत समिती जालना,ता. जि.जालना रा.रामनगर पोलीस कॉलनी ता.जि.जालना<br>२)श्री.कांता टोपे , खाजगी इसम रा.रामनगर पोलीस कॉलनी ता.जि.जालना |
| २ | गुन्हा घडला तारीख व ठिकाण | :- | दि.०८.०५.२०१९ रोजी आलोसे यांचे राहते घरी रामनगर पोलीस कॉलनी जालना येथे. . |
| ३ | लाचेची रक्कम | :- | १२,०००/- रुपये |
| ४ | सापळा अधिकारी | :- | श्री.आर.डी.निकाळजे ,पोलीस उप अधिक्षक , लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना. |

याबाबत थोडक्यात हकीगत अशी आहे की, तक्रारदार यांनी त्यांचे मौजे बाजीउम्रद ता.जि.जालना येथे १९२० चौरस फुटाची सहान जागाचा नोटरी बॉन्ड रजिष्टर द्वारे खरेदी केलेली होती. सदर जागा तक्रारदार यांचे नावे करण्यासाठी व नमुद जागेची ग्रामपंचायतला नोंद घेवून तसा नमुना नंबर ८ चा उतारा देण्यासाठी तक्रारदार यांनी त्यांचे गावच्या ग्रामसेवीका श्रीमती जगधने यांचेकडे सर्व कागदपत्रे देऊन त्यांना नमुना नंबर ८ मध्ये नोंद घेण्यासाठी विचारणा केली असता, त्यावेळी ग्रामसेवीका श्रीमती जगधने नमुना नंबर ८ मध्ये नोंद घेण्यासाठी तुम्ही मला १५०००/-रुपये दया असे म्हणाल्या त्यावर तक्रारदार म्हणाले की, मॅडम यावर्षी पाणी पाऊस नाही यांदा दुष्काळ पडला आहे असे म्हणाले असता त्यावेळी श्रीमती जगधने म्हणाले की ते काही असो तुम्हाला मला १५०००/-रुपये दयावे लागतील त्याशिवाय तुमचे काम होणार नाही. त्यावेळी तक्रारदार हे म्हणाले की, पैशाची जमावाजमाव करुन येतो असे म्हणुन तक्रारदार हे तेथून निघून आले. तक्रारदार यांची लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक कर्यालय जालना येथे तक्रार दिली.

त्यावरुन दि.०८/०५/२०१९ रोजी तक्रारदार हे श्रीमती जगधने यांची त्यांचे राहते घरी रामनगर पोलीस कॉलनी येथे पंचामसक्ष लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता ग्रामसेविका श्रीमती जगधने व खाजगी इसम श्री. कांता टोपे यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांचे मौजे बाजीउम्रद येथील सहान जागेची नोंद ग्रामपंचायतचे नमुना नंबर ८ मध्ये घेण्यासाठी पंचासमक्ष तडजोडअंती १२,०००/-रुपयाची लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले आहे.

त्यावरुन दि.२८/०५/२०१९ रोजी पो.ठाणे सदर बाजार येथे वरील आरोपीतांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**तसेच लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कडुन अवाहन करण्यात येते की कोणी लोक सेवक शासकीय कामासाठी लाचेची मागणी करीत असल्यास ०२४८२-२२०२५२, तसेच टोल फ्री क्रमांक १०६४ वर संपर्क करावा. तसेच पोलीस उप अधिक्षक जालना मो.नं.७९७२७२६१०१ पोलीस निरीक्षक मो.नं. ९८२३१४२६३२, ९७६७७४७७७४ वर संपर्क करावा.**

(रविंद्र डी.निकाळजे)
पोलीस उप अधिक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालना